महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ
सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१ . दुरध्वनी क्र. ०२२-२२६२०३०४
Email: director.msbae@gmail.com

क्रमांक :- कशिमं/पाच -२०२४/298 दिनांक:- २०.०९.२०२४

वाचा :- १) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप/२०२४/५७, दिनांक १६.०७.२०२४.
२) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप/२०२४/२३४, दिनांक १४.०८.२०२४.
३) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप-२०२४/२६५, दिनांक ३०.०८.२०२४.
४) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप-२०२४/२४२, दिनांक ०२.०९.२०२४.

## परिपत्रक

शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२४ करिता विद्यार्थ्यांचे हजेरीपत्रक सर्व केंद्र प्रमुखांच्या लॉगइन वर उपलब्ध आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्यात यावी. केंद्र शाळेत बैठक व्यवस्थेपेक्षा अधिकची नांवनोंद होत असेल तर सहभागी शाळेपैकी ज्या शाळेमध्ये प्रशिक्षित (कला शिक्षक पदविका अर्हताधारक) कला शिक्षक कार्यरत आहेत अशा शाळांमध्ये परीक्षेची गोपनियता राखुन उर्वरित विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था केंद्रशाळेचे मुख्याध्यापक व प्रशिक्षित कलाशिक्षक कार्यरत असलेल्या सहभागी शाळेच्या मुख्याध्यापक यांचे समन्वयाने परीक्षा आयोजनाबाबत संपर्ण कामकाज हाताळण्यात यावे.

विद्यार्थी उपस्थिती (Attendance) ऑनलाईन पध्दतीने केंद्र प्रमुखांच्या लॉगइनवरुन परीक्षा झाल्यानंतर त्याच द्विवशी भरणे (Submit) करणे आवश्यक राहील, याची नोंद घेण्यात यावी. एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेची निकालपत्रके (Result Sheet) केंद्र प्रमुखांच्या लॉगइन वर दिनांक ०१.१०.२०२४ रोजी उपलब्ध राहील.

शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षेसाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्याकरिता छायाचित्र व प्रश्नपत्रिका खालील तपशीलाप्रमाणे परीक्षा केंद्राच्या लॉगइन आयडीवर ऑनलाईन प्राप्त होईल.

## *एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा*

| क्र | विषयाचे नाव | परीक्षेची वेळ | गोपनिय प्रश्नपत्रिका केंद्राच्या लॉगइन वर पाठविण्याचा तपशील |
|---|---|---|---|
| | *बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०२४* | | |
| | वस्तुचित्र (Object Drawing) साहित्याकरिता छायाचित्र | | दि.२३.०९.२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| १ | वस्तुचित्र (Object Drawing) | १०.३० ते १.०० (२.३० तास) | दि.२४.०९.२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.०० ते ४.०० (२.०० तास) | |
| | *गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२४* | | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.०० (२.३० तास) | दि.२५.०९.२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| ४ | कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन (Plane Geometry & Lettering) | २.०० ते ४.०० (२.०० तास) | |

## इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा

| शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ | | | प्रश्नपत्रिका केंद्राच्या लॉगइन वर पाठविण्याचा तपशील |
|---|---|---|---|
| स्थिरचित्र (Still Life) साहित्याकरिता छायाचित्र | | | दि. २५.०९.२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| १ | स्थिरचित्र (Still Life) | १०.३० ते १.३० (३.०० तास) | दि.२६.०९.२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| २ | स्मरणचित्र (Memory Drawing) | २.३० ते ४.३० (२.०० तास) | |
| शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०२४ | | | |
| ३ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.३० (३.०० तास) | दि.२७.०९.२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| ४ | कर्तव्य भूमिती, घनभूमिती व अक्षरलेखन (Geometry, Solid Geometry & Lettering) | २.३० ते ५.३० (३.०० तास) | |

शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) या दोन्ही परीक्षांचे प्रत्येकी एक संच (मूळ निकालपत्रक) प्रिंट काढून ठेवावी. निकालपत्रकाच्या प्रति एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेच्या उत्तरपत्रिकांसोबत मुल्यमापन केंद्रावर केंद्रप्रमुख यांच्या स्वाक्षरीने प्रमाणित करुन सादर करावयाचे आहेत. मुल्यमापन केंद्राबाबतची सविस्तर माहिती करिता स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

संबंधित माहिती www.msbae.org.in / https://dge.msbae.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.

(विनोद दांडगे)
प्र.संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,

केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा तथा मुख्याध्यापक /प्राचार्य (सर्व).

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) उपसचिव(कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, नागपूर/औरंगाबाद.
२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
३) उप आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे.
४) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
७) शिक्षणाधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका (सर्व)
८) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.
९) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग,मुंबई.
१०) जिल्हा विद्यालय निरीक्षक, (सर्व) उत्तरप्रदेश / मध्यप्रदेश / उत्तराखंड/ छत्तीसगढ.
११) निवड नस्ती.